CMYK

## अभिनेत्री  जया प्रदा यांना ६ महिन्यांची शिक्षा,५ हजारांचा दंड

**चेन्नई :** प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री आणि समाजवादी पक्षाच्या माजी खासदार जया प्रदा यांना चेन्नई न्यायालयाने ६ महिन्यांची शिक्षा सुनावली आहे. चेन्नई मधील रायपेटमध्ये जया प्रदा यांचे स्वत:च्या मालकीचे थिएटर आहे. त्यांच्या थिएटरमधील कर्मचाऱ्यांनी केलेल्या याचिकेप्रकरणी जया प्रदा यांना ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच जयाप्रदा यांना ५,००० रुपयांचा दंडही ठोठावला आहे. या चित्रपटगृहात काम काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची ईएसआयची रक्कम भरलेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यावरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने ही शिक्षा सुनावली आहे.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## सोलापूर शहराच्या पाणी पुरवठ्याचे रोटेशन एक दिवस लांबणीवर


**सोलापूर :** सोलापूर शहराचा १३ ऑगस्टनंतरचा एक रोटेशन पाणी पुरवठा पुढे व उशिरा, कमी दाबाने, कमी वेळ होणार आहे. टाकळी हेडवर्क्स येथील पंप हाऊस जवळ पाईपलाईनला गळती लागली असून त्याच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.त्यामुळे टाकळी-सोरेगाव योजनेतून १३ ऑगस्टला शटडाऊन घेण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाने केले आहे.

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १२ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३१४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# मंत्रालयात मुष्टियुद्ध!

## मुख्यमंत्र्यांच्या WAR ROOM जवळ दादांचे CONTROL ROOM

## ऐकायचे कोणाचे? सरकारी बाबूंना पडलाय संभ्रम



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्याच्या मंत्रालयात सत्ताधारी पक्षात सध्या मुष्टियुद्ध सुरू असल्याचे दिसून येते. हा खेळ सर्वश्रुत आहे. मुष्टियुद्धाच्या खेळात दोन खेळाडू हातांत विशिष्ट प्रकारातील वजनाच्या चामड्याच्या मुष्टी घालून परस्पंराना ठोसे-प्रतिठोसे देऊन ठराविक वेळात हरविण्याच्या प्रयत्न करतात. आक्रमण आणि बचाव अशा दुहेरी अंगांनी त्यात खेळाडूचे कौशल्य पणास लागते. महायुतीतही तेच सुरू आहे.राजकारणी लोक ठोसेही देतात आणि स्वत:चा बचावही करून घेतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुखमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोघेही कौशल्यात 'प्रॉम्ट' आहेत तर सत्तेत नव्यानेच पाय ठेवलेले दुसरे उपमुखमंत्री अजितदादा पवार यांना मात्र कौशल्य दाखवून द्यावे लागणार आहे. तेच हत्यार त्यांनी उपसल्याने मंत्रालयात खळबळ उडाली आहे. शिंदे यांनी गेल्याच महिन्यात कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी 'वॉर रूम' उघडले तर दादांनी त्याच्या शेजारीच 'कंट्रोल रूम' स्थापन केल्याने सरकारी बाबूंची झोप उडाली आहे. आता नेमके जायचे कोणाकडे? या पेचात वरिष्ठ अधिकारी सापडले आहेत. हा प्रकार म्हणजे दादांनी मुख्यमंत्र्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्याचे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे.**

### देखरेख नक्की कोणाची?

राज्यातील प्रकल्पांच्या प्रगतीवर नक्की कोणाची देखरेख? असा प्रश्न मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या 'वॉररुम'च्याजवळ दादांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट म्हणजेच नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) सुरू केले आहे. मंत्रालयातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दोन दिवसांपूर्वी पार पडलेल्या बैठकीने राजकीय वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे.

मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर मुख्यमंत्र्यांची वॉररुम आहे. राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१५ मध्ये या वॉररुमची स्थापना केली. या वॉररुमच्या माध्यमातून समृद्धी महामार्ग, पुण्यातील रिंग रोड किंवा विमानतळाची काम यासारख्या पन्नासहून अधिक प्रोजेक्टचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मुख्यमंत्री ठाकरेंनी याचे नामांतर करून संकल्प कक्ष सुरू केला. आता सत्तांतर झाल्यानंतर पुन्हा एकदा वॉररुम हे नाव कायम ठेवण्यात आले आहे.

शिंदे यांनीही याच वॉररूममधून प्रकल्पांच्या आढावाच्या काही बैठकाही घेतल्या. मात्र याच वॉररुमवरुन सरकारमध्ये कोल्डवॉर सुरु झाले आहे काय? असा प्रश्न आता विरोधक विचारु लागले आहेत. मंत्रालयात मुख्यमंत्री वॉररुम असताना दादांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिटची स्थापना करून गुरुवारी या संदर्भातली बैठक घेतली. या बैठकीला मंत्रालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एवढेच नाही तर मुख्यमंत्री वॉररुमचे सर्वेसर्वा राधेश्याम मोपलावरही या बैठकीला उपस्थित होते आणि राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा अजित पवारांनी घेतला.

हा एकच आढावा नाही तर दर पंधरा दिवसांनी या प्रकल्पाबाबत ही बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे अजित पवारांकडून मुख्यमंत्र्यांच्या अधिकारावर अतिक्रमण होते का? असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. दादांनी पुण्यातील विकास कामांचा आढावा या बैठकीत घेतल्याचे सांगितले जाते. हाच आढावा पवार मागील सरकारच्या काळातही घेत होते. मात्र त्यावेळी ते पुण्याचे पालकमंत्री होते. मात्र आता पवार हे पालकमंत्री नाहीत. त्याचसोबत फक्त पुण्यातीलच कामांचा आढावा दादांनी घेतला नाही तर राज्यातील इतर विकासकामांचाही आढावा घेण्यात आला आहे. पवार यांच्याकडे वित्त खाते आहे. त्यांनी आढावा घेतलेल्या कामांचा तसा फारसा संबंध नसताना ही आढावा घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. यामुळे मंत्रालयातील सर्वच अधिकारी वर्ग गोंधळून गेला आहे.

### लक्ष कोण ठेवणार?

अजित पवार यांच्या नव्या खेळीमुळे प्रशासनावर कोण लक्ष ठेवणार व राज्यातील प्रकल्पावर नक्की कोणाचे नियंत्रण राहणार असा प्रश्न निर्माण झालाय. भविष्यात वॉररुम विरुद्ध कंट्रोल रूम असा संघर्ष झाल्यास आश्चर्य वाटू नये.

---

### हे तर कोल्डवॉर...

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महायुतीवर घणाघाती टीका केली. मुख्यमंत्र्याच्या वॉररूमवरून कोल्ड वॉर सुरू झाल्याचे त्यांनी नागपूर येथे शुक्रवारी बोलताना म्हटले. मुख्यमंत्र्यांच्या वॉररूमवरून कोल्डवॉर सुरू झाला आहे. कारण अधिकार नसताना उपमुख्यमंत्री अजित पवार वॉररूममध्ये बैठक घेतली. खात्याचा संबंध नसताना वॉररुममध्ये राज्यातील प्रोजेक्ट्सचा आढावा घेतला जातो. मुख्यमंत्र्यांना तो अधिकार आहे. तीन दिशेला तीन तोंडे आहेत. महाराष्ट्राच्या प्रश्नासाठी यांना वेळ नाही. राज्यात जे सुरू आहे, ते सगळे हास्यस्पद आहे.

---

कोणत्याही स्थितीत अभय योजना नाही : आयुक्त

## ३१ ऑगस्ट पूर्वी मिळकत कर भरा आणि सवलत मिळवा

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या वतीने मिळकत करासाठी कोणत्याही स्थितीमध्ये अभय योजना लागू करण्यात येणार नाही. शहरातील मिळकतदारांनी येत्या ३१ ऑगस्ट पूर्वी मिळकत कर भरल्यास सवलत मिळेल. तेव्हा नागरिकांनी कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी केले आहे.

सोलापूर शहरातील मिळकतदारांनी सन २०२३ - २४ या वर्षाचा चालू व थकीत मिळकत कर भरावा. हा मिळकत कर ३१ ऑगस्ट २०२३ पूर्वी भरल्यास पाच टक्के रिबेट आणि ऑनलाईन कर भरल्यास एक टक्के वाढीव सूट मिळणार आहे. कोणत्याही स्थितीमध्ये महापालिका प्रशासनाकडून अभय योजना लागू करण्यात येणार नाही. त्याची वाट न पाहता मिळकतदारांनी आपला मिळकत कर भरावा अन्यथा दरमहा दोन टक्के शास्ती लागू होणार आहे.

## गुंतवा पैसे देतो परतावा म्हणत ३ कोटी ९३ लाखांची फसवणूक

### संकल्प नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष व व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल

सुराज्य/पंढरपूर

चांगला परतवा देण्याच्या आमिषाने लाखो रुपयांच्या ठेवी गोळा करून सभासदांचे पैसे न देणाऱ्या येथील बहुचर्चित संकल्प नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्ष व व्यवस्थापकाविरोधात ३ कोटी ९३ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा विशेष लेखा परीक्षकाने शहर पोलीस ठाण्यात दाखल केला आहे. याप्रकरणी संकल्प नागरी सहकारी पतसंस्था, पतसंस्थेचा मुख्य प्रवर्तक तसेच अध्यक्ष प्रथमेश सुरेश कट्टे व संस्थेचे सचिव तथा व्यवस्थापक अविनाश दत्तात्रय ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील दोन वर्षापासून संकल्प पतसंस्थेमधील ठेवीबाबत दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. सदर पतसंस्थेच्या माध्यमातून प्रथमेश कट्टे याने शहरातील तसेच इतर जिल्ह्यातील अनेक लोकांकडून लाखो रुपयांच्या ठेवी गोळा केल्या होत्या. सदर सभासदांना सुरुवातीला चांगला परतावा देण्यात आला. यामुळे याची अधिक चर्चा होऊन सर्वसामान्या पासून अनेक बड्या लोकांनी या पतसंस्थेमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. मात्र त्यानंतर सभासदांना याचा परतवा मिळणे बंद झाले तसेच मुदत ठेव च्या रकमा देखील मिळत नव्हत्या.

कट्टे व त्याचे सहकारी यांचा संपर्क देखील होत नव्हता. यामुळे १२ ठेवीदारांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात आपली फसवणूक झाल्याची तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी विशेष लेखापरीक्षक बप्पाजी पवार यांची नियुक्ती करण्यात आली होती. पवार यांनी १ जून २०२२ पासून या घटनेचा तपास केला असता बारा ठेवीदारांची ३ कोटी ९३ लाख ७७ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी त्यांनी शहर पोलीस ठाण्यात सविस्तर अहवाल सादर करून कट्टे व त्याच्या साथीदारांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस उप निरीक्षक भागवत, सुरज हेंबाडे, शरद कदम, बिपीन ढेरे, सचिन हेंबाडे, दादा माने यांनी केली

## टेंभुर्णीत अप्पर तहसील कार्यालयाचा प्रशासनाचा प्रस्ताव

### १५ ऑगस्टचे आंदोलन रद्द; २७ गावाची सोय होणार

सुराज्य/सोलापूर

टेंभुर्णी परिसरातील २७ गावांसाठी अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची मागणी या परिसरतील ग्रामस्थांनी केली आहे. यासाठी १५ ऑगस्ट रोजी आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा दूध संघाचे संचालक शिवाजीराव पाटील यांनी दिला होता. याबाबतचा निवेदनाचा प्रस्ताव सचिवांकडे पाठविण्यात आल्याने हे आंदोलन रद्द करण्यात आले आहे.

या परिसरातील सुमारे २६ ग्रामपंचायतीने तसा ठराव करून पाठविला आहे. तसेच तीन गावच्या सरपंचांनी निवेदनावर सह्या दिल्या आहेत.

टेंभुर्णी परिसरातील अनेक लहानमोठ्या गावांना छोट्यामोठ्या कामासाठी माढा या तालुक्याच्या ठिकाणी जाणे गैरसोयीचे आहे. यामुळे यापरिसरातच अप्पर तहसील कार्यालय व दुय्यम निबंधक कार्यालय सुरू करण्यात यावे, अशी या परिसरातील ग्रामस्थांची मागणी आहे.

याबाबत जिल्हा दूध संघाचे संचालक शिवाजीराव पाटील यांनी २४ जुलै रोजी निवेदन जिल्हा प्रशासनाला पाठविले होते. याबाबतचे निवेदन गृह शाखेचे नायब तहसीलदार बनसोडे यांनी महसूल विभागाच्या सचिवांकडे पाठविले आहे. यामुळे १५ ऑगस्टचे आंदोलन रद्द करण्यात आले आहे.

या २७ ते ३० गावांचा सुमारे ६० किलोमीटर परिसर असून यातील काही गावे नदीकाठी असून दळणवळणासाठी अडचणीची आहेत. यामुळे या गावांना टेंभुर्णी येथे अप्पर तहसील कार्यालय व दुय्यम निबंधक कार्यालय सुरू होणे आवश्यक आहे. टेंभुर्णी, चांदज, रुई, गारअकोले, आढेगाव, अकोले बु. आलेगाव खु. वडोली, आलेगाव (बु.) उजनी (टें.) चव्हाणवाडी (टें.) दहीवली, सापटणे (टें), भुईंजे, अकोले (खु.)सुर्ली, शिराळ (टें) नगोर्ली, शेवरे,, टाकळी (टें) कन्हेरगाव, फुटजवळगाव, वरवडे, माळेगांव, मिटकलवाडी या ग्रामपंचायतीने ठराव दिले असून बेंबळे, घोटी व परिते या गावच्या सरपंचांनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## सरकारची तिजोरी भरली, ६.५३ लाख कोटींचा प्रत्यक्ष कर जमा, १५.७ टक्क्यांची भरघोस वाढ

सुराज्य/नवी दिल्ली

केंद्र सरकारच्या प्रत्यक्ष करामध्ये विक्रमी वाढ झाली असून १० ऑगस्टपर्यंत यामाध्यमातून ६.५३ लाख कोटी रुपये जमा झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या प्रत्यक्ष करामध्ये १५.७३ टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष कराच्या संकलनाच्या तुलनेत ही रक्कम ३२.०२ टक्के असल्याचे अर्थमंत्रालयाने सांगितलं आहे.


यामधून जर करदात्यांना करण्यात आलेला रिफंड वजा केला तर नेट टॅक्स हा ५.८४ लाख कोटी रुपये जमा झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही रक्कम १७.३३ टक्क्यांनी जास्त आहे.

अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, चालू आर्थिक वर्षात १० ऑगस्टपर्यंत, निव्वळ प्रत्यक्ष करांचे संकलन मागील वर्षाच्या तुलनेत १७.३३ टक्के अधिक आहे.

त्याच वेळी हा आकडा संपूर्ण आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या ३२.०३ टक्के इतका आहे. याचा अर्थ २०२३-२४ च्या संपूर्ण आर्थिक वर्षात सरकारच्या अंदाजे कमाईपैकी ३२ टक्क्यांहून अधिक रक्कम १० ऑगस्टपर्यंतच तिजोरीत आली आहे.

## अज्ञात कारणावरुन वृध्देने घेतला गळफास

सुराज्य/लक्ष्मी दहिवडी



डोंगरगाव येथे एका ७५ वर्षीय वृध्द महिलेने अज्ञात कारणावरुन राहते घरी नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली असून गंगूबाई ज्ञानू माळी असे मयत वृध्देचे नाव आहे. दरम्यान या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.

दि.११ रोजी सकाळी ७ वाजता खबर देणारे धनंजय माळी (रा.डोंगरगाव) यांचे चुलते ज्ञानू माळी यांची पत्नी गंगूबाई हे कुटूंबासह वस्तीवर रहावयास आहेत. चुलत भाऊ संजू हा घरी असताना तो खबर देणाऱ्यास सांगत आला की मी सकाळी ७ वाजता मारुती मंदिरात आरतीसाठी गेलो होतो. तेव्हा घरी कोणीच नसताना आई गंगूबाई हिने नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेतला आहे, असे सांगितल्यावर खबर देणारे व त्यांचा चुलत भाऊ मल्हारी असे मिळून सदर ठिकाणी गेले असता चुलतीने नॉयलॉनच्या दोरीने गळफास घेतल्याचे दिसून आल्याचे दिलेल्या खबर मध्ये म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अशीच नाराजी आहे सगळीकडे!!!

कल्याण
269-78-990

मेन बाजार
126-92-390

# मागील भांडणाचा राग; गाडीखाली चिरडून केले ठार

सुराज्य/पंढरपूर

**पटवर्धन कुरोली (ता. पंढरपूर) येथे मागील भांडणाचा राग मनात धरून देवीदास दिगंबर नाईकनवरे (वय ४२, रा. पटवर्धन कुरोली) यांना भररस्त्यावर बोलेरोखाली चिरडून ठार केल्याप्रकरणी मुख्य आरोपी ब्रह्मदेव संपत्ती नाईकनवरे याला करकंब पोलिसांनी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास अटक केली आहे. या गुन्ह्यात वापरलेली बोलेरो गाडीही ताब्यात घेण्यात आली आहे. आरोपी ब्रह्मदेव नाईकनवरे याला न्यायालयात हजर केले असता १६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**

पटवर्धन कुरोली येथे मागील भांडणाचा राग मनात धरून व सुनेच्या घटस्फोटामध्ये अडथळा ठरत असल्याच्या कारणावरून देवीदास दिगंबर नाईकनवरे (वय ४२, रा. पटवर्धन कुरोली) यांचा गुरूवारी भरदिवसा बोलेरो अंगावर घालून ठार केले होते. याबाबत ब्रह्मदेव नाईकनवरे, सिध्देश्वर नाईकनवरे यांच्यावर करकंब पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला होता. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे तालुक्यात खळबळ उडाली होती. पोलीस खातेही खडबडून जागे झाले होते. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवली. गुन्ह्यात वापरलेली जीप व्होळे (ता. पंढरपूर) परिसरातून ताब्यात घेतली तर या प्रकरणातील मुख्य आरोपी ब्रह्मदेव नाईकनवरे याला पंढरपूर तालुक्यात शुक्रवारी पहाटे अटक

## मुख्य आरोपी अटकेत; १६ तारखेपर्यंत पोलीस कोठडी

करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीला अटक केल्यानंतर पंढरपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. एस. सोनवलकर यांच्यासमोर हजर केले. या खुनामध्ये या तिघांचा कितपत सहभाग आहे, कट कसा केला, तो अंमलात कसा आणला याबाबत तपास करावयाचा आहे. शिवाय गुन्ह्यात वापरलेली बोलेरो गाडी त्याने गुन्हा घडल्यानंतर व्होळे परिसरात का नेऊन सोडली, त्या परिसरातील काही व्यक्ती यामध्ये सामील आहेत का, याबाबतचा तपास करावयाचा आहे, आरोपी हा उडवा उडवीची उत्तरे देत असून खरे सांगत नाही, याचा आणखी तपास करण्यासाठी पोलीस कोठडी मिळावी, अशी मागणी तपास अधिकारी सपोनि निलेश तारू यांनी मागणी केली.

त्यावर न्यायदंडाधिकारी ए.एस. सोनवलकर यांनी १६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील एम. एम. पठाण तर आरोपीतर्फे ॲड. सागर आटकळे, ॲड. सुहास कदम आर्दीनी काम पाहिले.

### गाडीला दिली धडक आणि परफटतही नेले

गुरुवार सकाळी १० च्या सुमारास देवीदासी नाईकनवरे हे एम. एच. १३ सी/ ९६४१ वरुन त्यांच्या घराकडे निघाले असताना ब्रह्मदेव नाईकनवरे यांने त्यांच्या बोलेरो गाडी क्र. एम. एच. १३ डी/एन ८९८४ ने पाटीठामागून वेगाने येऊन देवीदास यांच्या दुचाकीला धडक दिली आणि खाली पाडून शंभर ते दीडशे फूट फरफटत नेले. गाडी पुन्हा वळवून आणित देवीदास यांच्या अंगावर घातली आजण गाडीसह ते पळून गेले त्यानंतर देवीदास यांना जखमी अवस्थेत पंढरपूर येथील खासमी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारापूर्वीच ते मृत पावले.

CMYK